MHKO180003452022

**नियमीत दिवाणी दावा क्र.८९/२०२२ मधील**

**निशाणी क्र.१९ खालील आदेश.**

**(नंदिनी दिपक देशमाने वि. जब्बार सिकंदर नालबंद)**

वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिताचे कलम VI आदेश १७ अन्वये प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

०२. वादी यांच्या कथनानुसार, प्रस्तुतचा दावा रक्कम वसूलीकरीता दाखल करण्यात आला आहे. प्रस्तुत दावा दाखल करतेवेळी दाव्यातील परिच्छेद क्र.१ यामधील तिस–या ओळीत 'दिनांक २७.०४.२०१६' या ऐवजी '२७.०४.२०१३' असे अनावधानाने व टंकलेखनातील दोषामुळे नमूद करण्यात आलेले आहे. प्रस्तुत दावा दाखल केल्यानंतर वादी यांना सदरची चुक अवगत झाली. उपरोक्त नमूद चूक अनावधानाने, नजरचुकीने व टंकलेखनातील दोषामुळे झालेली असल्यामुळे त्याबाबत दाव्यामध्ये योग्य ती दुरुस्ती करण्याकरीता वादी यांना प्रस्तुत अर्ज दाखल करणे भाग पडले आहे. प्रस्तुत नमुद दुरुस्ती मंजुर केल्यास प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट, सदर दुरुस्ती न केल्यास वादी यांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे, प्रस्तुत अर्ज मंजुर करण्यात यावा, अशी विनंती वादी यांनी केली आहे.

०३. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जाच्या पाठीमागे त्यांचे म्हणणे दाखल करुन प्रस्तुत अर्ज नामंजूर करण्यात यावा, अशी विनंती प्रतिवादी यांनी केली आहे. प्रतिवादी यांनी वैकल्पीकरित्या असे नमुद केले आहे की, प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्याच्या निर्णयापर्यंत हे न्यायालय आल्यास, प्रस्तुतचा अर्ज जास्तीत जास्त खर्चासह मंजूर करावा.

०४. उभयपक्षाच्या विद्यमान वकीलांचा युक्तिवाद ऐकण्यात आला. दोन्ही पक्षांतर्फे त्यांच्या कथनानुरुप युक्तिवाद करण्यात आला.

०५. दावा, प्रस्तुत अर्ज व त्यावरील प्रतिवादी यांनी दाखल केलेल्या म्हणण्याचे अवलोकन करण्यात आले. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, प्रस्तुत दावा दाखल करतेवेळी दाव्यातील परिच्छेद क्र.१ यामधील तिस–या ओळीत 'दिनांक २७.०४.२०१६' या ऐवजी '२७.०४.२०१३' असे अनावधानाने व टंकलेखनातील दोषामुळे नमूद करण्यात आल्यामुळे सदर टंकलेखनातील दोष दुरुस्त करण्याकरीता वादी यांना प्रस्तुतचा अर्ज दाखल करणे भाग पडल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. प्रस्तावित

दुरुस्ती ही दाव्याचा गुणवत्तेवर निकाल लावण्याकरीता आवश्यक असल्याचे अभिलेखावरुन दिसून येत आहे. तसेच, वादी यांना प्रस्तुत अर्जामधील प्रस्तावित दुरुस्ती करण्यास परवानगी दिल्यास त्यामुळे प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नसल्याचे व दाव्याच्या स्वरुपाचे कोणताही बदल होणार नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे, वरील सर्व बाबींचा विचार करता, प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजुर करणे न्यायोचित होईल. वादी यांना प्रस्तुत अर्ज दाखल करण्यास झालेला विलंब विचारात घेता, प्रस्तुतचा अर्ज पाचशे रुपये इतक्या खर्चासह मंजूर करणे न्यायोचित होईल. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे :–

**:: आदेश ::**

१. प्रस्तुत अर्ज रक्कम रुपये ५००/– (अक्षरी रक्कम रुपये पाचशे फक्त) इतक्या खर्चासह मंजुर करण्यात येत आहे.

२. वादी यांनी पुढील तारखेपर्यंत दाव्यामध्ये नमुद दुरुस्ती करुन दाव्याची दुरुस्ती प्रत प्रस्तुत दाव्यात दाखल करावी. तसेच दुरुस्ती दाव्याची एक प्रत प्रतिवादी यांना द्यावी.

३. वादी यांनी खर्चाची रक्कम रुपये ५००/– (अक्षरी रक्कम रुपये पाचशे फक्त) प्रतिवादी यांना द्यावी.

४. येणेप्रमाणे अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

(आदेश खुल्या न्यायालयात निवेदित व अधिघोषीत करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by BALASAHEB SHRIPATRAO GAIKWAD
Date: 2026.02.23 17:43:03 +0530

दिनांक : २३.०२.२०२६ (बाळासाहेब श्री. गायकवाड)

कुरुंदवाड. दिवाणी न्यायाधीश क. स्तर ,

कुरुंदवाड.